# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date: 05 May 2024

## Time: 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक: ०५ मे २०२४ दुपारी १.०० वा.

****

खाद्यपदार्थांमध्ये वापराल्या जाणाऱ्या कीटकनाशकांच्या प्रमाणाबाबत भारताचे मापदंड आंतरराष्ट्रीय दर्जाचे असून, विभिन्न खाद्यपदार्थांसाठी विविध प्रमाणात त्यांचा वापर होत असल्याचं केंद्र सरकारनं स्पष्ट केलं आहे. कृषी मंत्रालयांतर्गत केंद्रीय कीटकनाशक महामंडळ आणि नोंदणी समिती- सी.आय.बी.आर.सी. कीटकनाशकांबाबतचे नियम ठरवते आणि याद्वारे नोंदणीकृत अशा २९५ पेक्षा जास्त कीटकनाशकांपैकी मसाल्यांधील वापरासाठी १३९ कीटकनाशकं निश्चित करण्यात आलेली आहेत. त्यांच्या प्रमाणाबाबत वैज्ञानिक विश्लेषणांच्या आधारावर सतत संशोधन करण्यात येत असल्याचंही केंद्र सरकारतर्फे सांगण्यात आलं आहे. भारतीय अन्नसुरक्षा आणि मानक प्राधिकरण- एफ.एस.एस.ए.आय. औषधी वनस्पती आणि मसाल्यांमध्ये दहा टक्क्यांपर्यंत कीटकनाशक वापरास परवानगी देत असल्याच्या माध्यमांवरील बातमीनंतर असं स्पष्टीकरण जारी करण्यात आलं आहे.

****

लोकसभा निवडणूक कालावधीत निवडणुकीचे अंदाज, अर्थात ओपिनियन, तसंच एक्झिट पोल दर्शविण्यास भारत निवडणूक आयोगानं मनाई केलेली आहे. महाराष्ट्रात एकूण पाच टप्प्यांमध्ये निवडणुका होत असून, गेल्या १६ मार्च रोजी आदर्श आचारसंहिता लागू झाल्यानंतर राज्यात गेल्या १९ एप्रिल रोजी सकाळी सात वाजेपासून येत्या एक जून २०२४ रोजी सायंकाळी साडे सहा वाजेपर्यंतच्या काळात हा प्रतिबंध लागू राहणार आहे. त्याचप्रमाणे प्रत्येक टप्प्यातील मतदान संपण्याच्या आधी ४८ तासांच्या कालावधीत असे अंदाज अथवा मतदान सर्वेक्षणाच्या परिणामांच्या प्रकाशन अथवा प्रसारणावर बंदी असेल, असं आयोगाच्या अधिसूचनेत स्पष्ट केलं आहे.

****

लातूर लोकसभा मतदारसंघात आज निवडणूक प्रचाराचा शेवटचा दिवस असल्यानं विविध पक्षांनी प्रचाराचा धडाका लावला आहे. काँग्रेस महाविकास आघाडीचे उमेदवार डॉक्टर शिवाजी काळगे यांच्या प्रचारार्थ लातूर शहरातील संविधान चौकात महाविकास आघाडीतर्फे जाहीर सभेचं आयोजन करण्यात आलं. महाराष्ट्रात इंडिया आघाडीचा प्रभाव असून, त्याचा जोर मराठवाड्यात अधिक असल्यानं, मराठवाड्यातल्या आठपैकी आठ जागांवर महाविकास आघाडीचेच उमेदवार निवडून येतील, असं काँग्रेस नेते अमित देशमुख यावेळी बोलतांना म्हणाले. मराठवाड्यासह महाराष्ट्रातील अनेक ठिकाणी महाविकास आघाडी निवडून येत देशात इंडिया आघाडीचं सरकार येईल, असा दावा देशमुख यांनी केला.

****

कोल्हापूर इथं महायुतीतर्फे लोकसभेचे उमेदवार संजय मंडलिक यांच्या प्रचारार्थ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत आज रॅलीचं आयोजन करण्यात आलं आहे. यावेळी युतीतील मित्रपक्षांचे नेते आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येनं दाखल झाले आहेत.

****

कोल्हापूरसह हातकणंगले लोकसभा मतदारसंघामध्ये ज्येष्ठ आणि दिव्यांग मतदारांनी घरपोच मतदानाचा हक्क बजावला असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे. गेल्या एक मे ते तीन मे दरम्यान ८५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांसह दिव्यांग मतदारांच्या घरी जाऊन मतदानाची प्रक्रिया जिल्हा प्रशासनानं पूर्ण केली. कोल्हापुरातल्या अडीच हजारांहून जास्त, तर हातकणंगलेतल्या साडे नऊशेहून अधिक मतदारांचा यात समावेश आहे.

****

अहमदनगर जिल्ह्यात, महायुतीतर्फे दिग्गज नेत्यांच्या उपस्थितीत प्रचाराचं नियोजन करण्यात आलं आहे. अहमदनगर दक्षिण लोकसभा मतदारसंघात येत्या १३ मे रोजी मतदान होत आहे. या ठिकाणी महायुतीचे उमेदवार डॉक्टर सुजय विखे-पाटील यांच्या प्रचारासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची जाहीर सभा मंगळवारी सात मे रोजी दुपारी सावेडी परिसरात होणार आहे. तर आठ मे रोजी राज्याचे कृषीमंत्री धनंजय मुंडे यांची शेवगाव तालुक्यातील बोधेगावसह राहुरी आणि श्रीरामपूर इथं सभा होणार आहे.

नऊ मे रोजी जामखेड आणि कोपरगाव इथं महायुतीचे उमेदवार सदाशिव लोखंडे यांच्यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रचारसभा होणार आहे. तसंच

उपमुख्यमंत्री अजित पवार हे कर्जत, पारनेर इथं नऊ मे रोजी सभा घेणार आहेत. नितेश राणे नऊ मे रोजीच जिल्ह्यात पाथर्डी इथं रॅलीत सहभागी होऊन शेवगाव इथं कार्यकर्त्यांच्या मेळाव्याला मार्गदर्शन करणार आहेत. तर दहा मे रोजी भाजपाचे वरिष्ठ नेते केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि केंद्रीय नागरी विमान वाहतुक मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांची जाहीर सभा श्रीगोंदा इथं होणार आहे.

भाजपा नेत्या पंकजा मुंडे दहा मे रोजी पाथरी इथं सभा घेणार आहेत. तर अकरा मे रोजी जिल्ह्यात, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या उपस्थितीत भव्य रॅली आणि सभा होणार असल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

इंडियन प्रीमियर लीग- आयपीएल क्रिकेट स्पर्धेची चुरस आता शिगेला पोहोचली आहे. एकंदर आजवरची स्थिती आणि प्राप्त आकडेवारीनुसार स्पर्धेत सहभागी सर्वच संघांनी दहा सामने खेळले आहेत. यात राजस्थान रॉयल्स संघ आठ विजयांसह सोळा गुण घेत अव्वल स्थानावर आहे, तर मुंबई इंडियन्स संघ आठ पराभव आणि सहा गुण घेत तळाच्या स्थानावर आहे. फलंदाजीत ऑरेंज कॅपसाठी ५४२ धावा फटकावणारा रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा विराट कोहली, तर गोलंदाजीत पर्पल कॅपसाठी १७ बळी टिपणारा मुंबई इंडियन्सचा जलदगती गोलंदाज जसप्रीत बुमराह आघाडीवर आहेत.

या स्पर्धेत आज डबल हेडर, अर्थात दोन सामने होत असून पहिला सामना पंजाब किंग्ज आणि चेन्नई सुपर किंग्ज यांच्यात दुपारी साडेतीन वाजता धरमशाला इथं होईल, तर दुसरा सामना लखनऊ सुपर जायन्टस आणि कोलकाता नाईट रायडर्स यांच्यात लखनऊ इथं संध्याकाळी साडे सात वाजता होणार आहे.

****